# प्रकरण पाचवे

## महाराष्ट्र राज्याचे ग्रामीण विधि व न्याय मंत्री म्हणून राजारामबापू पाटील यांचे कार्य ( १९७८ )

## प्रकरण पाचवे

### मा. राजारामबापू पाटील - ग्रामीण विकास, विधि व न्यायमंत्री म्हणून केलेले कार्य --

मा.श्री.राजारामबापू पाटील यांनी महाराष्ट्राचे उद्योग व वीजमंत्री असताना अनेक महत्वपूर्ण निर्णय घेऊन महाराष्ट्र राज्याचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता. संबंध राज्यामध्ये उद्योगधंद्याचे जाळे पसरविण्यामध्ये मोठा वाटा उचलला होता. खेडोपाड्यामध्ये गोरगरीब शेतकऱ्यांच्यापर्यन्त कमी दरामध्ये वीज पुरवठा करुन आपल्या कार्याचा ठसा उमटविलेला होता. त्यांच्या या ठळक कार्याची दखल घेवूनच मा.बापूंना १९७२ च्या विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी वाळवा मतदार संघातून कॉंग्रेसचे उमेदवार म्हणून तिकिट देण्यात आले होते. यावेळी मा.बापूंच्या विरोधात शेतकरी कामगार पक्षाचे नेते मा.श्री.वसंत शिंदे तसेच जनसंघ तर्फे (भारतीय जनतापक्ष) राजाभाऊ जोशी हे निवडणुकीस उभे होते. परंतु मा.बापूंनी या सर्वांच्यावर मात करुन तिसऱ्यादा मोठ्या विक्रमी मताधिक्क्याने निवडून आले, होते. यावेळी मा.राजारामबापू पाटील यांना ६५,००० हजार मते मिळालेली होती.[१]

मा.राजारामबापू पाटील यांना १९७२ ते १९७८ या काळामध्ये मंत्रीमंडळामध्ये घेण्यात आलेले नव्हते. तरीही ते कधीही निराश झाले नाहीत. तर १९७२ ते १९७८ च्या महाराष्ट्र विधान सभेत ते पाचवर्ष सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाचे जागृत व कर्तव्यतत्पर आमदार म्हणून गणले गेले. प्रसंगविशेषी त्यांनी सरकारवर निर्भयपणे प्रखर टीका केली, आमदार या नात्याने त्यांनी सभागृहाच्या विविध भागामध्ये उत्साहाने भाग घेतला. सत्ताधारी पक्षाचा आमदार विधानसभेच्या व्यासपीठाचा उपयोग आपल्या मतदार संघाचे, विभागाचे व राज्याचे प्रश्न मांडण्यासाठी आणि जनतेच्या गाऱ्हाण्यांना व तक्रारींना वाचा फोडण्याचे व तिच्यावरील अन्यायाचे निवारण करवून घेण्यासाठी प्रभावीपणे व परिणामकारकपणे प्रयत्न केले याचा एक आगळा आदर्श मा.बापूंनी आपल्या वैधानिक कार्य कौशल्याने व त्या कार्यातील दक्षतापूर्ण सहभागाने निर्माण केला.[२]

## सुजगांव परिषद --

सत्ताधारी कॉंग्रेस पक्षामध्ये असताना मा.बापूंनी १९७३ मध्ये सुजगाव परिषद घेऊन शेतकऱ्यांचे जीवन सुजला-सुफला व्हावे म्हणून वारणा धरणातून पाटाचे पाणी मिळावे या मागणीसाठी एक लाख लोकांची विराट शेतकरी परिषद घेऊन धरणास विरोध करणाऱ्या स्वपक्षीयांशी संघर्ष केला होता.सुजगांव धरणाची मोहिम ही मा.बापूंच्या राजकीय जीवनातील एक महत्वाची घटना आहे. तिच्यात त्यांच्या बंडखोरीचे व संघटन कुशलतेचे जसे दर्शन आहे,त्याहीपेक्षा आधिक त्यांनी त्यासंबंधीचा जो अभ्यास केला त्याला विशेष महत्व आहे.हाती घ्यावयाच्या कोणत्याही कार्याची शक्य तेवढी अभ्यासपूर्ण पूर्व तयारी करावयाची ही मा.बापूंची कार्यपध्दती होती.कार्याच्या व यशाच्या दृष्टीने ती पुरेशी व निर्दोष होती असेच काही म्हणता येणार नाही.परंतु सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आमदार व मंत्री यांच्या संदर्भात ती दुर्मिळ होती हे खास.[3]

मा.बापूंनी स्वत:ला पक्ष कार्यात गुंतवून घेतले होते.त्यावेळी(१९७२ ) महाराष्ट्रामध्ये दुष्काळाने एक नवे आव्हान निर्माण केले होते.हजारों ग्रामीण शेतकरी शेतमजूर स्त्री पुरुष संघटित होऊन सरकारकडे कामे मागत होते व भीक मागायला नकार देत होती.ग्रामीण गरीबांचे हे संघटन उभारण्याचे कार्य प्रामुख्याने विरोधी डावे पक्ष कार्यकर्ते करीत होते.अशावेळी कॉंग्रेसपक्षाने सुध्दा या ग्रामीण श्रमिकांचे संघटन उभे केले पाहिजे असा विचार कॉंग्रेस पक्षात मांडण्यात ज्या ज्या मंडळींनी पुढाकार घेतला त्यामध्ये मा.बापू एक प्रमुख नेते होते. अर्थात हे काम खास अभ्यासू पायावर केल्याशिवाय उभे करता येणार नाही याची श्री राजारामबापू पाटील यांना पूर्ण जाणीव होती.[4]

## १९७५ मधील आणीबाणी --

भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वावर मा.बापूंचा पूर्ण विश्वास होता.१९७५ मध्ये आणीबाणीच्या काळात २० कलमी कार्यक्रम जाहीर केल्यानंतर आपल्या मतदार संघात पदयात्रा करुन प्रत्येक गांवात जाऊन इंदिराजींचा २० कलमी कार्यक्रम त्यानी सर्वांना समजावून सांगण्यासाठी वाळवे तालुक्यातील ९७ गावाची ६५० कि.मी.पदयात्रा केली.इंदिरा गांधीच्या २० कलमी

कार्यक्रम इतक्या जिल्हाळ्याने परिश्रमपूर्वक पदयात्रेने आम जनतेपर्यन्त पोहोचविणारा हा भारतातील एकमेव लोकप्रतिनिधी असे म्हटले जाते. एवढी मा. बापूंची गांधीच्या नेतृत्वावर निष्ठा होती.[५]

## कॉंग्रेस पक्षाचा त्याग व लोकशाही कॉंग्रेसमध्ये प्रवेश --

मा.श्री.राजारामबापू पाटील यांनी पदयात्रा केली. त्यावेळी मा.श्री शंकरराव चव्हाण हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते व चव्हाण यांना मुख्यमंत्री पदावरुन बाजूला करुन मा.श्री वसंतरावदादा पाटील यांना मुख्यमंत्री पदावर आणण्यात महाराष्ट्रातील राजकारण यशस्वी झाले होते. मा.श्री शंकरराव चव्हाण यांना मुख्यमंत्री होण्यासाठी श्रीमती इंदिरा गांधी यांनी पाठींबा दिला होता. परंतु त्यांना विश्वासात न घेता शंकरराव चव्हाण यांना काढण्याचे राजकारण शिजले गेले व ते यशस्वी झाले ही गोष्ट मा.राजारामबापू पाटील यांना मुळीच आवडली नाही व दादा मुख्यमंत्री झाल्यावर महाराष्ट्रात आता इंदिरा गांधीची कॉंग्रेस राहिली नाही म्हणून त्यांनी कॉंग्रेस पक्षाचा त्याग केला व लोकशाही कॉंग्रेसमध्ये प्रवेश करुन जगजीवनराम बाबूच्या नेतृत्वाखाली कार्यास सुरुवात केली.[६]

## लोकशाही कॉंग्रेसचे जनता पक्षात विलिनीकरण व जनता उपाध्यक्षपदी निवड --

मा.राजारामबापू पाटील यांनी कॉंग्रेस पक्षाचा त्याग करुन लोकशाही कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर त्यानी कॉंग्रेसकडे कधीही वळून पाहिले नाही. त्यांनी जनता पक्षाचा प्रचार व प्रसार घडवून आणण्यात फार मोठा वाटा उचलला. मा.बापूंनी कॉंग्रेसपक्षाचा त्याग करुन जनता पक्षात जाणे हा निर्णय त्यांच्या निश्चयी स्वभावाचे दर्शन दिसून येते. केवळ वसंतदादा पाटील यांच्याशी असलेला संघर्ष आणि मतभेद एवढेच मर्यादित कारण सांगता येणार नाही तसे संघर्ष अटळच असतात. पण कॉंग्रेस पक्षात राहून आपल्याला मनासारखे सार्वजनिक कार्य करता येणार नाही अशी खात्री पटल्यामुळेच ते कॉंग्रेस पक्ष सोडून गेले. राष्ट्रीय चळवळीतील ध्येयवाद त्यांच्या मनामध्ये ठामपणे रुजला होता, त्या ध्येयवादामुळेच ते सतत सार्वजनिक कार्यामध्ये गुंतलेले असत म्हणूनच मा.बापूंना स्वयंप्रकाशी नेते असे म्हणतात.[७]

राजकीय क्षेत्रातील प्रभावी व्यक्तिमत्व म्हणून मा.बापूंचा महाराष्ट्रात दीर्घकाळ दबदबा होता.कॉंग्रेस मधून विरोधी पक्षात गेल्यानंतरही तेथे मा.बापूंनी मोठ्या जोमाने कार्य करीत राहिले. या काळात जनता पक्षाचा शहरी भागात चेहरा मोहरा बदलण्यात व हा पक्ष ग्रामीण भागापर्यन्त पोहोचविण्यात त्यांनी मोलाचा वाटा उचलला. सत्ता असो अगर नसो सतत कार्य करीत राहाण्यातच मा.बापूंनी आनंद मानला.मा.बापू हे या पिढीतील आगळे अभ्यासनीय आणि उमेदीच्या नव्या कार्यकर्त्यांना अनुकरणीय असे मार्गदर्शक व्यक्तिमत्व होते,त्यांनी जनता पक्षात असताना जनता पक्ष बळकट करण्यामध्ये व तो सर्व खेडोपाड्यामध्ये पोहोचविण्यात महत्वाचा भाग घेतला,त्यामुळेच जनतापक्ष महाराष्ट्रात फोफावल्याचे दिसून येते.[८]

मा.राजारामबापू पाटील यांना जनता पक्षाची पाळेमुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पोचविण्याचा प्रयत्न करणारा शिल्पकार असे मा.श्री.प्रा.मधु दंडवते यांनी म्हटलेले आहे. कार्यकर्त्यांना बरोबर नेणे,त्यांच्या वागण्याबोलण्यात भारदस्तपणा होता.प्रतिपक्षाचे डावपेच ते ओळखून असत.त्यावर मात करण्याचे शास्त्रही त्यांना अवगत होते.यामुळेच महाराष्ट्रातील जनता पक्ष त्यांनी चांगला टिकविला आणि खेड्यापाड्यात नेऊन पोचविला.[९]

<u>मुंबई महानगरपालिका मतदार संघातून विधान परिषदेवर निवड --</u>

१९७८ मध्ये मा.राजारामबापू पाटील यांची मुंबई महानगरपालिका मतदार संघातून विधान परिषदेवर निवड झाल्यानंतर त्यांच्या राजकीय जीवनामध्ये अनेक स्थित्यंतरे घडून आली पण कितीही अडचणी आल्या तरी मा.बापू खचून गेले नाहीत,त्यांनी आपल्या कार्यात नेहमीच सातत्य ठेवले.त्यामुळे ते मुंबई महापालिकेच्या सेवकातर्फे विधान परिषदेवर निवडून आले आणि पुरोगामी लोकशाही मा.श्री शरद पवारांच्या मंत्रिमंडळात ग्रामीण विकास आणि विधि व न्यायखात्याचे मा.बापू मंत्री झाले.[१०]

पुरोगामी लोकशाही आघाडीच्या मंत्रिमंडळात ग्रामीण विकास ,विधि व न्याय खात्याचे मंत्री म्हणून निवड --

लोकशाही समाजवादी पक्ष व जनता पक्षात विलीन झाल्यानंतर १९७९ मध्ये पुरोगामी लोकशाही आघाडीच्या नेतृत्वाखाली मा.श्री.शरद पवार यांच्या नियंत्रणाखाली मा.बापू मुंबई महानगरपालिका मतदार संघातून विधान परिषदेवर निवडून आल्यानंतर मा.बापूना श्री शरद पवार यांनी महाराष्ट्राच्या मंत्रि मंडळामध्ये ग्रामीण विकास विधि व न्याय खात्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली ती जबाबदारी मा.बापूंनी प्रामाणिकपणे पार पाडली.[११]

महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षाचे नेते पद जनता पक्षाला मिळाले होते, त्यावेळी विधान परिषदेमध्ये जनता पार्टीचे चार सभासद होते.स्वर्गीय राजारामबापू पाटील,प्रा.ग.प्र.प्रधान,श्रीमती मंगला पारिख व प्रा.सदानंद वर्दे, या सर्वांमध्ये ज्येष्ठ व जाणते होते कै.राजारामबापूच त्यांच्याकडेच हे नेते पद जाणार असे सर्वांना वाटत होते.व सर्वच दृष्टीने कै.राजारामबापूही त्या पदाला योग्य असेच होते.प्रा.ग.प्र.प्रधान हे विधान परिषदेवर पदवीधर मतदार संघातून तीन वेळा निवडून आले होते व यापुढे निवडणूक न लढविण्याचे त्यांनी ठरविले होते.तेव्हा निवृत्त होण्यापूर्वी आपणास विधानपरिषदेचे नेते पद मिळावे अशी प्रामाणिक इच्छा प्रा.प्रधान यांनी मा.बापूंच्या जवळ बोलून दाखविली व त्या क्षणीच बापूंनी कोणत्याही प्रकारचे आढेवेढे न घेता विधानपरिषदेचे विरोधी पक्षाचे नेते पद प्रा.प्रधानांना दिले. सदगुणांची कदर करण्याची गुणग्राहकताही त्यांच्या ठिकाणी दिसून येते.[१२]

मा.श्री.राजारामबापू पाटील यांनी महाराष्ट्राचे ग्रामीण विकास विधी व न्याय खात्याचे मंत्री म्हणून केलेले कार्य खालीलप्रमाणे -

मा.राजारामबापू पाटील कै.वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळामध्ये कॅबिनेट दर्जाचे महसूलमंत्री होते.तसेच पुढे त्यांच्याकडे उद्योग व वीज यासारखी राज्याच्या विकासात मूलभूत महत्त्व असलेली खाती अतिशय समर्थपणे सांभाळली आणि या खात्याच्या धोरणांवर आपल्या कुशल प्रशासनाचा व दूरदृष्टीचा ठसा उठविला

होता.त्यामुळेच मा.बापूंना १९७८ मध्ये मा.श्री.शरद पवार यांनी ग्रामीण विकास विधि व न्याय खात्याचे मंत्रीपद दिले होते.मा.बापूंनी या मिळालेल्या मंत्रीपदाचा उपयोग ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठी केला.त्यामुळेच त्याची अल्पवधीत मंत्री म्हणून कारकिर्द महाराष्ट्र राज्यात महत्वपूर्ण ठरली.

त्यांच्या कार्याचा धावता आढावा खालीलप्रमाणे --

मा.राजारामबापू पाटील यांना ग्रामीण विकास मंत्री असताना श्री दौलतराव भोसले यांनी जिल्हापरिषद ,बीड येथील आरोग्य खात्यात लस टोचकांच्या जागेवर किती कर्मचारी काम करतात व त्यात मागासवर्गीय कर्मचारी किती आहेत असा प्रश्न विचारल्यानंतर मा.बापूंनी क्षणाचाही विलंब न लावता बीड जिल्हा परिषदेच्या आरोग्य सेवा खात्यात एकूण ८२ लस टोचक असून त्या पैकी १६ अनुसूचित जातीचे,२ भटक्या जातीचे व १२ इतर मागासवर्गीय असे एकूण ३० मागासवर्गीय कर्मचारी असल्याची माहिती देऊन सेवा जेष्ठतेच्या आधारावर एकूण ३० लस टोचक पदोन्नती मिळविण्यासाठी पात्र असून त्यापैकी २ अनुसूचित जातीचे,१ भटक्या जातीचा व २ इतर मागासवर्गीय असे एकूण ५ मागासवर्गीय उमेदवार आहेत.इतर मागासवर्गीय उमेदवारांना वगळता मागासवर्गीयांना पदोन्नती मध्ये मॉडेल रोस्टरप्रमाणे अग्रक्रम देण्याबाबतच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आल्याची माहिती मा.बापूंनी दिली.महाराष्ट्रामधील सर्व जिल्हा परिषदेमध्ये जास्तीत जास्त मागासवर्गीयांना नोकरीत सामावून घेण्याचा व त्यांच्या अडचणीचे निवारण करण्याचा त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केला.[१३]

औरंगाबाद जिल्हातील पाणी टंचाईग्रस्त गावांना पाणी पुरवठा

मा.राजारामबापू पाटील यांना श्रीमती कुमूद रांगणेकर(महाराष्ट्र पदवीधर) यांनी औरंगाबाद जिल्हातील किती गावांना एप्रिल ते जून १९७९ या कालावधीत टंचाईस तोंड द्यावे लागले.तसेच या गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने कोणत्या तात्पुरत्या व कायम उपाय योजना केल्या आहेत याचे उत्तर देत असताना मा.बापूंनी औरंगाबादसाठी ६९८ गावाना एप्रिल ते जून १९७९ या काळात पाण्याची टंचाई भासली असल्याची माहिती सांगून औरंगाबाद जिल्हातील ज्या

गांवाना पिण्याच्या पाणीची टंचाई आहे अशा गांवामध्ये टँकर द्वारे विहिरींना ब्लास्टिंग करुन बैलगाडीद्वारे नदीच्या पात्रात शेवड्या खोदून, नवीन विंधन विहिरी खोदून, विहिरीचे पुनर्जीवन करणे, विहिरीतील गाळ काढणे, व विहिरीवर हातपंप, व विद्युत पंप बसविणे इत्यादि उपाययोजनाद्वारे पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे मा. बापू यांनी सांगितले.[१४]

मा. राजारामबापू पाटील यांनी ग्रामीण विकासमंत्री असताना महाराष्ट्रातील अनेक दुष्काळग्रस्त भागामध्ये पाणीपुरवठा योजना आखून तेथे पाण्याची सोय उपलब्ध करुन दिली. त्याचप्रमाणे पालघर तालुक्यातील पाणीपुरवठा योजना मंजूर केली. तसेच नांदेड जिल्ह्याच्या मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद नळ पाणी पुरवठा योजनेचे प्लॅन्स व एस्टिमेन्टस मंजूरी देण्याचे महत्वपूर्ण कार्य करुन तेथील लोकांना ज्या गैरसोईंना तोंड द्यावे लागत होते त्या गैरसोई मा. बापू ग्रामीण विकास मंत्री असताना सदैव सोडविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.[१५]

तसेच टेंभुर्णी (तालुका जाफराबाद जिल्हा औरंगाबाद ) येथील नळ पाणी पुरवठा योजना --

अकोला या गावांना संयुक्त नळपाणी पुरवठा योजना केन्द्र शासनाच्या नियमाप्रमाणे तयार करुन त्यातील तांत्रिक अडचणी दूर केल्यानंतर ते काम अधिक्षक अभियंता परिसर अभियांत्रिकी मंडळ औरंगाबाद यांच्याकडे सोपविले.[१६]

वाळवे तालुक्यातील टंचाईग्रस्त गांवाना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा --

मा. राजारामबापू पाटील यांनी वाळवे तालुक्यातील टंचाई ग्रस्त पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी कोळे, नरसिंगपूर, येडेमचिंद्र, विचूर, रेठरेहरणाक्ष, ताकारी, दुधारी, भवानीनगर, किल्लेमचिन्द्र गड, लवणामाची व लेरडमाची इत्यादि गांवाना नियमित व स्वच्छ व शुध्द पाण्याचा पुरेसा पुरवठा होण्यासाठी कायमस्वरुपी नळ पाणी योजना मंजूर केल्या व या टंचाईग्रस्त भागातील लोकांना दिलासा दिला.[१७]

तसेच मुराट तालुका देवगड, मौजे मणचे, (ता. देवगड ) मौजे ममदापूर (ता. अंबे - जोगाई ) येथील पाणी टंचाईचा विचार करुन तेथे नळ पाणी पुरवठयाची योजना

मंजूर करुन तेथील पाण्याचा सोडविण्याचा प्रयत्न केला .ग्रामीण विकास मंत्री असताना खेडोपाडीजावून त्यांनी या प्रश्नाचा बारकाईने अभ्यास केला होता व त्यावर तोडगाही योग्य पध्दतीनेच काढलेला होता.[१८]

निगडीबुद्रूक (ता.जत,जि:सांगली ) येथील तलावाचे काम --

मा.बापूंनी पाठबंधारे मंत्री मा.श्री.नरेंद्र तिडके यांना प्रश्न विचारुन या तलावाचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे या तलावाच्या कामामध्ये गोरगरीब लोकांना जास्तीत जास्त रोजगार मिळावा यादृष्टीने प्रयत्न केला.[१९]

त्याचप्रमाणे मा.राजारामबापू पाटील यांनी लक्षवेधी सूचना केल्यामुळेच मा.पाठबंधारे मंत्री शांताराम घोलप यांच्या परवानगीने कृष्णा नदीवर ,सांगली जिल्ह्यातील बहे,नागठाणे व बोरगांव येथे बांधण्यात येणाऱ्या बंधाऱ्यांच्या कामाची प्रगती घडून आली.

तसेच कासेगांव (तालुका वाळवा ) येथील सोमेश्वर सहकारी पाणी पुरवठा संस्थेची कर्जफेडीसाठी मुदतवाढीची मागणी करणारे एक निवेदन आले आहे.त्या संदर्भात करण्याचे विनंतीवजा मा.बापूंनी सांगली जिल्ह्याचे संपर्क मंत्री मा.श्री.शंकर-राव पाटील यांना विचारलेले होते.[२०]

वाळवे तालुक्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई --

वाळवे तालुक्यातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर आवाज उठवून कामेरी, बहादूरवाडी, वशी,लमाणावाडी,जांभूळवाडी,कापूरवाडी,कुरळूप ,बावची,ओझार, या गावांतील पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी प्रयत्न केले. तर काही ठिकाणी बोअरच्या पाण्याची सोय उपलब्ध करुन दिली तसेच मणिकवाडी,येलूर येथील नळपाणी पुरवठा योजना मंजूर केल्या.पेठ,वाघवाडी,कुंडलवाडी,गाताडवाडी, मालेवाडी,ढवळी,नागाव,येथील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी आड खोदाईची कामे सुरु करुन पाणी पुरवठा करण्याचा प्रयत्न केला.

केदारवाडी गावाला नळ योजना टाकीतून पाणी आणण्याचे काम पूर्ण करुन वाळवा तालुक्यातील पाणीप्रश्न सोडविण्याचा मा.बापूंनी प्रयत्न केला.[२१]

त्याचप्रमाणे सांगली जिल्हातील कामेरी, इटकरे, येडेनिपाणी, तुजारपूर, गाताडवाडी, अहिरवाडी, पडवळवाडी, इ. गावांच्यासाठी एक सामुहिक नळ योजना लवकरात लवकर मंजूर व्हावी अशी मागणी मा. बापूंनी मुख्यमंत्री यांचेकडे केली. म्हणून मा. मुख्यमंत्री श्री वसंतराव नाईक यांनी अधिक्षक अभियंता आरोग्य मंडळ, पुणे यांच्यामार्फत त्यांना या योजनेस मान्यता दिली व त्याठिकाणी असलेला पाणीपुरवठा सोडविला.[२२]

मुंबई येथील लघुवाद न्यायालयातील प्रलंबित असलेली प्रकरणे --

मा. राजारामबापू पाटील ग्रामीण विकास विधि व न्याय खात्याचे मंत्री असताना श्री. रा. का. चौधरी यांनी (विदर्भ पदवीदर) मुंबई येथील लघुवाद न्यायालयामध्ये ३० एप्रिल १९७९ पर्यन्त किती प्रकरणे अनिर्णित होती व ती अनिर्णित राहाण्याची कारणे कोणती ? असे प्रश्न बापूना विचारले होते. त्यावर मा. बापूंनी अभ्यासपूर्ण उत्तर देत असताना मुंबई येथील लघुवाद न्यायालयामध्ये ३० एप्रिल १९७९ पर्यन्त एकूण ६९,१२४ प्रकरणे अनिर्णित होते व या न्यायालयाची आधीकारीका वाढल्यामुळे प्रलंबित प्रकरणाची संख्या वाढली. आयुक्ताकडून (कमिशनर) अहवाल वेळेवर न येणे तसेच अधिक न्यायालयासाठी जागेची कमतरता असल्याचे सांगून न्यायाधीश नेमणे मुंबईत सोपे आहे पण त्यांच्यासाठी जागा पुरविणे ही एक कठीण समस्या आहे. त्यासाठी न्यायालयाच्यासाठी आणि न्यायाधिशाना राहाण्यासाठी इमारती बांधल्या पाहिजेत असा विचार करुन हे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे म्हणून दरवर्षी एक कोटी रुपये बाजूला ठेवावे असा निर्णय घेण्यात येऊन सहाव्या पंचवार्षिक योजनेत ५ कोटी रुपयांची तरतूद करुन न्यायालयाची व न्यायाधिशाच्या राहणीचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न सुरु असल्याचे मा. बापूंनी ठामपणे सांगून मग न्यायालयातीलप्रकरणे त्वरित निकालात निघण्यास मदत होईल असे त्यानी सांगितले. मा. बापूंनी विधि व न्याय खात्याचे मंत्री असताना महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेच्या समोरील अडचणीचे निवारण करण्याचा कसोसीने प्रयत्न केला. न्यायालय-न्यायाधिश यांच्या जागेचा, राहाणेचा प्रश्न सोडविण्यासाठी एक खास तरतूद करुन फार मोठे कार्य केल्या-मुळेच आज महाराष्ट्रातील कित्येक ठिकाणी न्यायालय व न्यायाधिश यांना

सुविधा उपलब्ध झाल्या असल्याचे दिसून येते.[२३]

ग्रामसेवक प्रशिक्षण केन्द्रे,पंचायती राज प्रशिक्षण केन्द्र व गारगोटी येथील प्रशिक्षण केन्द्र येथील प्रशिक्षण कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी केलेली समिती --

मा.बापूंनी ग्रामसेवक प्रशिक्षण केन्द्रे स्थापन केल्याचे सांगून ग्रामसेवक प्रशिक्षण केन्द्रे,पंचायती राज प्रशिक्षण केन्द्रे आणि गारगोटी येथील संयुक्त प्रशिक्षण केन्द्रामार्फत घेतल्या जाणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी जानेवारी १९७४ मध्ये शासनातर्फे पुनर्विलोकन समिती स्थापन केली होती. त्यानुसार या समितीने मे १९७६ मध्ये पंचायती राज संस्थामधील पदाधिकारी आणि अशासकीय सदस्य यांचे प्रशिक्षण एकाच प्रशिक्षण केंद्रात घेण्यात यावे.प्रशिक्षण जास्तीत जास्त परिणामकारक होण्याचे दृष्टीने सध्याच्या अभ्यासक्रमात योग्य तो फेरफार अथवा सुधारणा व्हावी ,प्रशिक्षण केन्द्रातील अध्यापक वर्गाला प्रशिक्षण दिले जावे अशा अनेक प्रकारच्या शिफारसी करुन मा.बापूंनी ग्रामसेवक प्रशिक्षण केन्द्रे,पंचायती राज प्रशिक्षण केन्द्रे यांच्यासाठी केलेल्या होत्या. गुणवत्ता टिकली पाहिजे व ती जास्तीत जास्त वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे मा.बापूंनी यामध्ये सांगितलेले होते.[२४]

ट्रान्सफॉर्मर्स बसविण्याची तरतूद केली --

सांगली जिल्हामध्ये पुरेशा क्षमतेचे ट्रान्स्फॉर्मर्स बसविण्याची कारवाई करण्यात यावी असी मागणी मा.बापूंनी उर्जामंत्री श्री नरेंद्र तिडके यांना केल्यामुळेच त्यांनी सन १९७७ मध्ये वाळवा,शिराळा,तासगांव,खानापूर,आटपाडी,मिरज,जत, व कवठेमहंकाळ इत्यादि ठिकाणी ट्रान्स्फॉर्मर्स बसविण्याची परवानगी दिली. मा.बापूंनी कधीही स्वत: राजकीय अभिलाषेपोटी फक्त वाळवा तालुक्याचा विचार केला नाही,तर त्यानी संपूर्ण सांगली जिल्हाचा सर्वांगीन विकास साधण्याचा सातत्याने प्रयत्न केलेला दिसून येतो.[२५]

मा.राजारामबापू पाटील ग्रामीण विकास व विधि व न्याय तसेच माहिती व जनसंपर्क मंत्री असताना दैनिके,साप्ताहिक व पाक्षिके यांना शासनाकडून जास्तीत जास्त मान्यता व सुविधा उपलब्ध करुन दिल्या तसेच त्यांच्या कारकिर्दीत ३७ दैनिके,१३५ साप्ताहिके व ६ पाक्षिकांना मान्यता मिळवून देऊन दैनिके,साप्ताहिके व पाक्षिके ही जन जागृतीचे प्रमुख कारण असल्याचे मान्य करुन त्याची जास्तीत जास्त वाढ घडवून आणण्यामध्ये व महत्वाचा वाटा उचलला.[२६]

मोफत शिक्षणाची सोय --

मा.श्री.राजारामबापू यांनी विधान सभेमध्ये महाराष्ट्रातील गोरगरीब मुलांच्या शिक्षणाची सोय मोफत व्हावी,त्यांना उच्च शिक्षण घेता यावे त्यांचा सर्वांगीन विकास व्हावा यासाठी समाजकल्याण मंत्री श्री.अ.श्री.कस्तुरे यांना राज्यामध्ये व मागासवर्गीय वसतिगृहे किती आहेत व त्या ठिकाणी किती मुले शिक्षण घेण्यासाठी आलेली आहेत तसेच १९७५ ते १९७६ या काळात किती मागासवर्गीय वसतिगृहांना शासकीय परवानगी देण्यात आली आहे असी अनेक महत्वपूर्ण प्रश्न विचारुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मोफत पण चांगले शिक्षण मिळावे ,त्यांना वसतिगृहाची सोय उपलब्ध व्हावी ,त्यांना सरकारी नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात यावे यासंबंधी मा.बापूंनी अतिशय प्रामाणिकपणे प्रयत्न केले.[२७]

पुणे येथे स्टेडियमची उभारणी--

भारतीय खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी खेळासाठी पुणे येथे अद्यावत स्टेडियम बांधण्यात यावे असी मागणी मा.राजारामबापूनी केल्यामुळेच खेळमंत्री श्री.ह.गो. वर्तक यांनी या बांधकामास १२ लाख रुपये स्टेडियमसाठी एकूण खर्च येणार असल्याचे सांगून ३ लाख ५० हजार रुपये मंजूर करुन बांधकामास सुरुवात केली असल्याचे सांगण्यात आले. पुणे स्टेडियमची मुळ कल्पना मा.बापूंची असल्यामुळे व बापूंना त्यामध्ये विशेष आवड असल्यानेच ते स्टेडियमची उभारणी करण्यासाठी प्रोत्साहन देत राहिलेले दिसून येते.[२८]

रॉकेल दुकानाना प्रोत्साहन --

मा.बापूंनी इस्लामपूर येथील रॉकेल दुकानांचे स्थगित केलेले परवानगी व निर्माण झालेली रॉकेल टंचाई यावर आवाज उठविला, त्यामुळेच त्यावेळचे अन्न नागरी पुरवठा मंत्री श्री.ह.गो.वर्तक यांनी परत त्या दुकानाना परवाने देऊन जादा धान्याचा व रॉकेलचा कोठा मंजूर करुन त्या भागातील लोकांचे प्रश्न त्वरित मिटविले.[२९]

स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन --

मा.बापूंनी स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन मिळावी यासाठी प्रयत्न केला म्हणूनच १,१८८ व्यक्तिंना त्याकाळात स्वातंत्र्य सैनिक म्हणून मान्यता मिळाली व त्यांना पेन्शन मिळू लागली.

इस्लामपूर येथील गोळीबाराची न्यायालयीन चौकशी --

मा.बापूंनी श्री शरद पवार यांना इस्लामपूर येथे १९६२ मध्ये झालेल्या गोळीबाराची न्यायालयीन चौकशी करण्यासाठी केलेल्या आयोगाचा चौकशी अहवाल काय आहे व तो केव्हा जाहिर होणार या संदर्भात प्रश्न विचारुन त्यावर आवाज उठविण्याचा प्रयत्न केला.[३०]

शीतगृहे उभारणीमध्ये सहभाग --

मा.राजारामबापूंनी सातारा जिल्ह्यात बटाटे साठवून ठेवण्यासाठी शीतगृहे उभारावीत अशी मागणी केली, त्यामुळेच शासनाने सातारा जिल्ह्यातील कोरेगाव येथे एक शीतगृह बांधले व ते आता मॅफको ला शासकीय महामंडळाकडे आले असल्याचे कृषी मंत्री श्री.शंकरराव चव्हाण यांनी सांगितले.मा.बापू हे जागृत असे कार्यकर्ते होते.

तसेच वाळवे तालुक्यातील ग्रामीण भागातील स्वस्त धान्य दुकानाना बंद करण्यात आलेला धान्यपुरवठा त्वरित चालू व्हावा यासाठी प्रयत्न करुन गोरगरीब लोकांच्या अडचणी सोडविण्याचा आटोकाट प्रयत्न केला.[३१]

## अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अधिवेशन --

कर्नाटकमधील बेळगांव येथे दि.९ व १० जून १९७९ रोजी अखिल भारतीय पत्रकार परिषदेचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनाचे उद्घाटन करीत असताना महाराष्ट्राचे माहिती व जनसंपर्क मंत्री श्री राजारामबापू पाटील म्हणाले होते की मराठी पत्रकारांनी शिवाजी महाराजांच्या निर्भिड व निर्भय बाण्याचा वारसा पुढे चालविला पाहिजे कारण पत्रकारांमध्ये समाजजीवन मुलगामीरित्या बदलण्याचे सामर्थ असते.याप्रसंगी महाराष्ट्राचे राज्यमंत्री श्रीमती शांती नाईक मराठी परिषदेचे अध्यक्ष श्री नारायण आठवले व श्री रणजित देसाई उपस्थित होते.[३१]

## महाराष्ट्र राज्य कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजनेचे उद्घाटन --

मुंबई येथील के.सी.कॉलेजच्या सभागृहामध्ये १४ एप्रिल १९७९ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश मा.श्री.य.वि.चंद्रचूड यांचे हस्ते महाराष्ट्र राज्य कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजनेचे उद्घाटन करण्यात आले त्यावेळी मुख्यमंत्री श्री शरद पवार व विधि व न्यायमंत्री श्री राजारामबापू पाटील हे हजर होते. त्यावेळी मा.बापूंनी आपल्या स्वागतपर भाषणात ही योजना तयार करण्या-मागील पार्श्वभूमी सांगून राज्य स्तरापासून तालुका पातळीपर्यन्त कायदेविषयक सहाय्य व सल्ला देणाऱ्या समित्या लौकरच स्थापन करण्यात येतील असे सांगून या योजनेच्या यशासाठी सर्व संबंधितांच्या सहकार्याची गरज असल्याचे आवाहन केले.तसेच गरिबांना कायदेविषयक सहाय्य देणाऱ्या योजनेला संपूर्ण सहाय्य असल्याचे सांगितले.[३३]

## महाराष्ट्रातील दैनिकांच्या संपादकांचा मेळावा --

मुंबई येथे दे.भ.संदेशकार श्री अच्युतराव कोल्हटकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त महाराष्ट्रातील दैनिकांच्या संपादकांचा एक मेळावा आयोजित करण्यात आला होता.त्यावेळी त्या समारंभाचे उद्घाटन महाराष्ट्राचे राज्यपाल मा.श्री. सादिक अल्ली यांनी केले होते.या मेळाव्यासाठी ग्रामीण विकास मंत्री मा.श्री.राजारामबापू पाटील व महसूल मंत्री मा.श्री.उत्तमराव पाटील व

श्री माधव गडकरी, राजा केळकर इत्यादि उपस्थित होते.[३४]

आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूर भेट --(१९७९ )

आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूर येथील विठ्ठलाची महापूजा ग्रामीण विकासमंत्री मा. राजारामबापू पाटील यांनी केली. त्यांच्यासमवेत पाटबंधारे मंत्री श्री शिवाजीराव पाटील होते, त्यावर्षी या आषाढी एकादशीच्यादिवशी सुमारे दोन ते अडीच लाख यात्रेकरु आले होते.[३५]

पुणे येथील ज्ञानप्रबोधिनी संस्थेस भेट -- (१९७९ )

महाराष्ट्राचे विधि व माहिती खात्याचे मंत्री मा. श्री. राजारामबापू पाटील यांनी सन १९७९ मध्ये पुणे येथील ज्ञानप्रबोधिनी संस्थेस भेट देऊन तेथील प्रदर्शनाची पाहणी केली, त्यांच्या समवेत प्रबोधिनीचे मुख्य संचालक श्री डॉ. आप्पासाहेब पेंडसे व तरुण भारत चे संपादक श्री देवधर उपस्थित होते. मा. बापूंना अशी संस्था आपल्या तालुक्यात असावी व ज्ञानदानाचे काम या संस्थेने करावे असे वाटत होते. मा. राजारामबापू ज्ञान प्रबोधिनी या संस्थेची स्थापना करण्यात आली . या संस्थेचे कार्य आज अतिशय उत्स्फूर्तपणे चाललेले आहे.[३६]

महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांचे नवनिर्वाचित अध्यक्ष यांच्या पहिल्या परिषदेचे उद्घाटन --

महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांचे नवनिर्वाचित अध्यक्ष व इतर पदाधिकारी यांच्या पहिल्या परिषदेचे उद्घाटन ३ सप्टेंबर १९७९ रोजी मंत्रालयामध्ये मुख्यमंत्री श्री शरद पवार यांनी केले. त्यावेळी ग्रामविकास मंत्री मा. श्री. राजारामबापू पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले होते. यावेळी महसूल मंत्री श्री उत्तमराव पाटील हेही उपस्थित होते.[३७]

महाराष्ट्र राज्य कुस्तिगीर परिषदेच्या अधिवेशनात सहभाग --

नाशिक रोड येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य कुस्तिगीर परिषदेच्या २४व्या अधिवेशनाच्या निमित्ताने झालेल्या कुस्ती स्पर्धात मुंबईचे श्री शिवाजी पाचपुते

यांनी महाराष्ट्र केसरीचा बहुमान मिळविला.कुस्ती करणाऱ्या सर्व तरुणांना मा.बापूंनी प्रेरणा देऊन मा.बापूंच्या हस्ते मुंबईचे श्री शिवाजी पाचपुते यांना महाराष्ट्र केसरी चा बहुमान देऊन त्यांचा सत्कार मा.बापूंच्या हस्ते करण्यात आला.त्या प्रसंगी कुस्तिगीर परिषदेचे अध्यक्ष श्री मामासाहेब मोहोळ हेही हजर होते.[३८]

पुरग्रस्तांना ब्लँकेटस वाटप ( १९७९ )

ऑगस्ट १९७० मध्ये अतिवृष्टीमुळे वर्धा,वेण्णा आणि काटेपूर्णा या विदर्भातील नद्यांना महापूर आला होता. त्यावेळी अंतरगांव या पुरग्रस्त गावातील लोकांना ग्रामीण विकास माहिती व जनसंपर्क मंत्री मा.श्री.राजारामबापू पाटील यांच्या हस्ते ब्लँकेटसचे वाटप करण्यात आले.यावेळी मा.बापूंनी त्या लोकांना दिलासा देण्याचे पवित्र कार्य केले.[३९]

विदर्भात पुरामुळे अतोनात नुकसान --

अमरावती जिल्ह्यातील बोरगांव येथील पुरग्रस्त भागाची मा.मुख्यमंत्री शरद पवार यांनी पाहाणी केली,त्यांच्या समवेत ग्रामविकास मंत्री मा.श्री.राजारामबापू पाटील व विरोधी पक्षनेत्या श्रीमती प्रतिमा पाटील याही उपस्थित होत्या, त्यावेळचा भावपूर्ण प्रसंग --` राजमार्गापासून रस्ता नसलेल्या आडवळणातील वीस किलोमिटर अंतरावर असलेल्या पुरग्रस्तांना भेटले पाहिजे त्यांना दिलासा दिला पाहिजे यासाठी चिंचमंडळ येथे मुख्यमंत्री मा.श्री.शरद पवार स्वत: जीप चालविण्यास बसले,त्यांच्या शेजारी ग्रामीण विकासमंत्री श्री राजारामबापू पाटील व श्रीमती प्रभाराव बसल्या होत्या. अनेक आडचणी असल्या तरीही जीप चिंचमंडळ गावापर्यन्त नेऊन आपण कुशल सारथी असल्याचे मुख्यमंत्र्यानी दाखवून दिले. मा.मुख्यमंत्री व मा.ग्रामीणविकास मंत्री यांनी तेथील लोकांना दिलासा दिला,त्यांच्या अंगावरुन प्रेमाने हात फिरविला.[४०]

जनसंपर्क मंत्री यांचा मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघातर्फे सत्कार(१९७९)

मा.ग्रामीण विकास मंत्री श्री राजारामबापू पाटील यांचा मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघातर्फे सत्कार करण्यात आला.त्याप्रसंगी या संघाचे अध्यक्ष

श्री कृ.पा.सामक यांनी मा.बापूंना पुष्पगुच्छ अर्पण केला.यावेळी मा.बापूंनी प्रसिध्दी अधिकाऱ्यांच्या कामास पुरेपूर वाव व संधी मिळेल याबद्दल त्यांनी खात्री बाळगावी ,त्यांनी आपले काम निर्भयतेने व नि:संकोचपणे करावे,ज्याच्यांसाठी शासनाचे प्रयत्न चालू आहेत,त्या सामान्य जनतेपर्यन्त ते पोहोचविण्याची जबाबदारी या खात्याची असल्याने या बाबतीत जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत अशी माहिती मा.बापूंनी यावेळी दिली.[४१]

दुधाच्या किंमतीचा फेरविचार करण्यासाठी तज्ञाची बैठक --

मा.राजारामबापू पाटील ग्रामीण विकास मंत्री असताना शेतमालाचे पडले भाव व उत्पादनाचा वाढता खर्च याबद्दल खंत व्यक्त केली व शेतीसाठी लागणाऱ्या काही बाबीवरील खर्च कमी करण्यासाठी राज्य शासनाने काही महत्वपूर्ण निर्णय घेतले असल्याचे सांगितले.[४२]

धोत्रे गावची एक हृदयस्पर्शी घटना --

साहेब मी निराधार आहे,अपंग आहे पण धंदा करुन मला स्वाभिमानाने जगायचंय आणि मला धंदासाठी कर्ज मिळवून द्या,अशी कळकळीची विनंती व्यासपीठाला टेकून बसलेला एक अपंग हात जोडून ग्रामीणविकास मंत्री मा.श्री. राजारामबापू पाटील यांना करीत होता.आणि समारंभ संपवून श्री.पाटील दुसऱ्या कार्यक्रमाला उशिर होऊ नये म्हणून घाईघाईने व्यासपीठावरुन उतरुन मोटारीत बसण्यासाठी निघाले होते आणि नेमक्या त्याच क्षणी त्या अपंगाची हाक त्यांचे कानी आली,आणि श्री पाटील तेथेच थांबले ,त्या अपंगाकडे जाऊन त्यांनी त्याची हकिगत ऐकून घेतली.ही हृदयस्पर्शी घटना घडली नगर जिल्ह्याच्या कोपरगांव तालुक्यातील धोत्रे येथील नुकत्याच झालेल्या शेतकरी परिषदेच्या वेळी.

श्री राजारामबापू यांनी क्षणाचाही विचार न करता खिशात हात घातला आणि निघाले तेवढे म्हणजे तीनशेंहे रुपये त्या अपंगास उद्योग व्यवसायासाठी दिले,इतकेच करुन ग्रामविकास मंत्री थांबले नाहीत,तर त्या गावच्या प्रमुख कार्यकर्त्यांना त्यांनी सांगितले की,या तीनशेंहे रुपयात वर्गणीची भर घालून या गरीब जिद्दीच्या अपंगाचा उद्योग व्यवसाय उभा राहू द्या आणि मग ग्रामविकास मंत्री दुसऱ्या कार्यक्रमास जाण्यास निघाले.

राजभाषा वर्षानिमित्त डिसिल्वा हायस्कूल मुंबई व टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे दोन परिसंवाद आयोजित केले होते --

त्यावेळी मा. विधि व न्याय मंत्री श्री राजारामबापू पाटील यांनी व्यक्त केलेले मौलिक विचार ( १९७९ ) —

गेल्या वर्षी दिल्लीला झालेल्या राजभाषा संमेलनाने शिफारस केल्याप्रमाणे सन १९७९ वर्ष महाराष्ट्रात व देशात राजभाषा वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. त्या त्या राज्याच्या राजभाषेचा शासकीय व्यवहारात तसेच कायद्याच्या क्षेत्रात पुरेसा वापर होत नाही असे त्या संमेलनातील निरनिराळ्या प्रतिनिधींच्या निवेदनावरुन दिसून आले. या प्रश्नाकडे सर्व राज्य सरकारांचे तसेच त्या त्या क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व विद्वानांचे लक्ष वेधावे म्हणून राजभाषा वर्ष साजरे करण्याचा हा निर्णय घेण्यात आला आहे.

लोकशाहीत लोकांची भाषा हीच राजकारभाराची भाषा असली पाहिजे ही जाणीव ठेवून सन १९६५ मध्ये महाराष्ट्र शासनाने मराठीला राजभाषेचा कायदेशिर दर्जा प्राप्त करुन दिला. सन १९६६ च्या महाराष्ट्र दिनापासून सर्व सरकारी कामकाजासाठी तिचा वापर करण्यासाठी कायद्याने तरतूद केली आहे. या राज्यात मराठी भाषेचा सर्व अंगाने विकास घडवून आणण्याचे कार्य जनते इतकेच सरकारचेही आहे. शासन व्यवहाराची भाषा म्हणून तिची वाढ करण्याची जबाबदारी सर्वार्थाने शासनाने पत्करावयाची आहे. या दृष्टीने महाराष्ट्र सरकार शक्य ते सर्व प्रयत्न करीत आहे.

आज प्रादेशिक भाषांच्या विकासाला एक अखिल भारतीय संदर्भ प्राप्त झाला आहे. प्रत्येक राज्य हे संघराज्यातील एक स्वतंत्र घटक असले तरी त्या सर्वांच्या समन्वयातून भारत हे राष्ट्र आकारास आले आहे. राष्ट्राचे ऐक्य अभंग राखण्याच्यादृष्टीने राष्ट्रीय धोरणातही सामंजस्याची भावना वाढीस लागणे आवश्यक आहे. या एका राष्ट्रीयत्वाला बळकटी येण्यासाठी भारतीय भाषांनी परस्परांच्या जवळ आले पाहिजे. परस्परांतील एकात्मतेचा शोध घेतला पाहिजे, त्यासाठी शक्य असेल तिथे एका समान सूत्रात त्यांनी आपल्याला बांधून घेतले पाहिजे.

ज्ञानभाषा व लोकभाषा एक हवी --

ज्ञानभाषा आणि लोकभाषा एक झाल्याशिवाय समाज जीवन समर्थ होत नाही.ज्ञानभाषा एक आणि लोकभाषा दुसरी अशी भारताच्या जीवनाची परंपरागत कहाणी आहे. स्वातं-यानंतर जेव्हा जनजीवन विकसित करावयाचे आहे तेव्हा लोकभाषा ही ज्ञानभाषा झाली पाहिजे.भाषा नेहमी विचारांच्या पाठीमागे येत असते.भाषेचे खरे सामर्थ्य विचार व्यक्त करण्यात आहे.सन १९३०-३२ च्या चळवळींनंतर महाराष्ट्रामध्ये समाजवादाचे वाङ्.मय समजून घेण्याची जबरदस्त लाट निर्माण झाली पण हे सर्व साहित्य इंग्रजी भाषेत होते.समाजवादाची , राजकारणाची,अर्थशास्त्राचीपरिभाषा मराठीत आणण्यासाठी काम मोठे किचकट होते.परंतु आपल्या काही मंडळींनी मराठी भाषेत लिहिण्यास सुरुवात केली आणि त्याचा परिणाम म्हणजे ती भाषा कळावयास लागली आहे.

शासनाच्या संदर्भात विशेषत: न्यायाच्या संबंधात राजभाषेच्या वापराचा प्रश्न हा अनेक दृष्टीने गुंतागुंतीचा बनलेला आहे. सध्याच्या आपल्या न्याय व्यवस्थे प्रमाणे जिल्हा व तालुका स्तरावरील कोर्टापासून तो सुप्रिम कोर्टापर्यन्त एक चढती मालिका आपल्या दृष्टोत्पत्तीस येते.या सर्व कोर्टातून आज इंग्रजी या भाषेचा वापर होताना दिसून येतो. ही परिस्थिती,राज्यभाषेच्या वापरला अधिक प्राधान्य द्यावयाचे ठरविले तर राहणार नाही.सुप्रिम कोर्ट व हायकोर्ट वगळता, इतर सर्व कोर्टातून व ट्रायब्यूनल्स मधून आपल्या राज्यभाषेचा म्हणजेच मराठीचा वापर करावा लागणार आहे. कायद्याच्या क्षेत्रात कोणत्या भाषेचा वापर करावा यासंबंधीही घटनेत तरतूद असून त्या त्या राज्याला एक वा अनेक पास केलेला असून तो गेली तेरा वर्षे अंमलात आहे.

सुवर्णमध्य गाठला पाहिजे --

उच्च न्यायालयातून सर्वोच्च न्यायालयाकडे सोपविली जाणारी अनेक प्रकरणे असतात व सुप्रिम कोर्टात त्या प्रकरणावर आपल्या राजभाषेत विचार होणे सर्वथा अशक्य आहे याचाच अर्थ सुप्रिम कार्टाची भाषा म्हणून आपल्या राजभाषेहून एक वेगळी भाषा ती म्हणजे हिन्दी किंवा इंग्रजी रहाणारच आहे.

भारताची न्यायाच्या क्षेत्रातील एकात्मता कायम ठेवावयाची तर राज्य स्तरावर व केन्द्रिय स्तरावर न्याय दानाच्या क्षेत्रात दोन भिन्न भाषांचा वापर करणे हे कितपत जरुर आहे असाही प्रश्न विद्वानांच्यापुढे आहे.अनेकांना कायद्याची भाषा हीसर्वच स्तरावर म्हणजेच तालुका स्तरापासून सर्वोच्च न्यायालयाच्या स्तरापर्यन्त एकच असावी असे वाटते.तर इतर अनेकांनी त्या त्या राज्यात हायकोर्टाच्या स्तरापर्यन्त आपली राजभाषा वापरली जावी असे आग्रहाने प्रतिपादन केले आहे. प्रत्येक नागरिकाला त्यांच्या भाषेत न्याय मिळणे,त्यांच्या भाषेत त्यांच्या कज्जा-खटल्याचे काम न्यायालयात चालणे व त्याच्याच भाषेत वकिलांनी युक्तिवाद करणे हा त्यांचा हक्क आहे व तो सर्वांनी मान्य करावा असे बापूंनी आपले मत व्यक्त केले.तसेच आज ना उद्या मराठीचा वापर कॉलेजमधून,ऑफिसमधून,कोर्टामधून करावाच लागणार आहे,त्याकरिता आवश्यक ती सिध्दता करणे अत्यंत गरजेचे आहे.

कायदा सर्वांना समजावा हा नैसर्गिक न्याय -

कायदा आपल्या पायावर कधीच उभा राहात नाही.त्याला अंमलबजावणी-साठी सरकारवर अवलंबून असावे लागते. कायद्याच्या विरोधी असलेल्या गोष्टीपासून तो माणसाला परावृत्त करु शकेल,परंतु चांगले वागण्याची प्रेरणा देऊ शकत नाही.कायदा हक्क प्राप्त करुन देतो.परंतु तो सामान्यजनापर्यन्त पोहोचत नाही, जोवर सामान्य नागरिकांच्या मताचे अधिष्ठान त्यास प्राप्त होत नाही.कायद्याचा दुसरा दंडक असा आहे की,मला कायदा माहित्त नाही अशी सबब सांगून कुणीही आपली सुटका कायदा मोडून करुन घेऊ शकत नाही याचा अर्थ असा नव्हे की, प्रत्येकाला कायदा कळतो किंवा उमजतो किंवा माहित्त असतो.परंतु कायद्याच्या क्षेत्रात असा बहाणा चालू दिला तर त्या बहाण्याचे प्रत्युत्तर देणे कठीण असल्यामुळे कायदा माहित्त नव्हता,अशी सबब पुढे करुन कुणाचीही कायद्यापासून सुटका होऊ देणे कायद्याच्या राज्याच्या दृष्टीने हितावह नाही.

गुणवत्ता कमी होणार नाही --

इंग्रजांच्या राज्यात सुध्दा मराठीतून दावा व दाव्याचे उत्तर देण्याची

प्रथा होती.काही न्यायाधिश मराठीतून सर्व कामकाज चालवित असत.हैद्राबाद, बडोदे आणि इतर संस्थानातून तेथील राज्याच्या माध्यमातून न्यायालयाचा कारभार चालत असे.तेव्हा मराठीतून न्यायालयाचे काम चालले तर न्यायालयाची गुणवत्ता कमी होईल हे मानणे चुकीचे होईल. शेवटी शिक्षणाचे तोंड एकीकडे,शासकीय राज्यकारभाराचे दुसरीकडे व न्यायालयाचे तिसरीकडे असा विसंगवादी सूर फार काळ चालू शकणार नाही.

न्यायालयात मराठीचा वापर वाढला पाहिजे सामान्य पक्षकार आपल्या दाव्याबाबत काय चालले आहे ते पाहण्यास कोर्टात जेव्हा जातो तेव्हा तेथे काय चालले आहे ते त्याला समजले पाहिजे.या दृष्टीने वकील वर्गाने पूढाकार घेऊन आजची परिस्थिती सुधारण्याच्यादृष्टीने काही सूचना शासनाकडे कराव्यात असे या परिसंवादात मा.बापूनी आपले बहुमोल विचार मांडले.[४४]

मा.राजारामबापूंचा षष्टयब्दी सोहळा -- ( १९८० )

मा.राजारामबापू पाटील यांच्या वयाला ६० वर्ष पूर्ण झाल्यामुळे त्यांचा षष्टयब्दी सोहळा आयोजित करण्यात आला होता.त्यावेळी मुख्यमंत्री मा.श्री.ए. आर. अंतुले यांनी मा.बापूंचे अभिष्ठचिंतन केले होते.यावेळी सर्व पक्षीय नेत्यांची उपस्थिती होतीव लाखो लोकांच्याकडून प्रेमाचा वर्षाव झालेला होता.सर्व जनतेकडून पाच लाख रुपयांची थैली मा.बापूंना अर्पण करण्यात आली होती. पुढे याच रकमेतून राजारामबापू पाटील विकास प्रतिष्ठान या सामाजिक ट्रस्टची स्थापना करण्यातआली.[४५]

महाराष्ट्र जनता पक्षाच्या अध्यक्षपदी दुसऱ्यादा फेरनिवड ( १९८१ )

पुरोगामी लोकशाही आघाडीच्या मंत्रीमंडळामध्ये मा.बापू ग्रामीण विकास विधि व न्याय मंत्री होते.अर्थात त्यावेळी ते जनता पक्षाचे नेते होते.सन १९८० च्या काळात मा.मुख्यमंत्री श्री शरद पवार यांचे मंत्रीमंडळ बरखास्त झाल्यानंतर कॉंग्रेस आयचे मंत्रिमंडळ महाराष्ट्रात निर्माण होऊन मा.श्री.ए.आर.अंतुले मुख्यमंत्री झाले. मा.बापूंनी या काळामध्ये जनता पक्षाचे काम निष्ठेने आणि कळकळीने चालविलेले

होते. सन १९८० मध्ये जेव्हा शेतकऱ्यांची दिंडी महाराष्ट्र विधानसभेच्या नागपूर अधिवेशनावर नेण्यात आली, त्यावेळी जळगांव पासून नागपूर पर्यन्त या दिंडीत खरीखुरी पदयात्रा काढलेले जे मूठभर लोक होते त्यात मा. राजारामबापू पाटील हे अग्रेसरच म्हणावे लागतील. वयाच्या ६०व्या वर्षी अशी पदयात्रा काढण्यासाठी माणूस निष्ठावान आणि जिद्दीचा असावा लागतो. मा. बापू हे असे निष्ठावंत होते. म्हणूनच त्यांना जनतापक्षाचे महाराष्ट्रातील एक भक्कम आधारस्तंभ मानले होते. जनता पक्षाला याची जाणीव असल्यामुळेच त्यांची सोलापूर येथील महाराष्ट्र जनता पक्षाच्या अधिवेशनात दुसऱ्यांदा जनता पक्षाचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली होती.[४५]

## संदर्भ


| | | | |
|---|---|---|---|
| १ | घोरपडे संताजी साहेबराव | - | मुलाखत, दि.३०-१२-९३, कासेगाव. |
| २ | कारखानीस टी.एस. कोल्हापूर | - | राजारामबापू पाटील - काही आठवणी १७ जानेवारी, १९८५, पृ.१६. राजारामबापू पाटील: स्मरणिका, संचालक - पाटील शामराव, इस्लामपूर. |
| ३ | गरूड शैताराम इंचलकरंजी | - | कार्य आणि कार्यकर्ते उभे करणारा नेता, इस्लामपूर, सन १९८५, पृ.२ मा.राजारामबापू पाटील स्मरणिका, चैतन्य स्मरण - संपा.पाटील शामराव, |
| ४ | तत्रैव | - | पृ.३. |
| ५ | पाटील लालासो कृ. इस्लामपूर | - | कै.राजारामबापू पाटील सच्चा शेतकरी नेता दै.अग्रदूत (सांगली), दि.१७-१-८८. |
| ६ | साळवी पी.जी.आय.ए.एस मुंबई | - | बापू म्हणजे निरंतर सौजन्य, सन १९८६, पृ.३ राजारामबापू पाटील ज्ञानप्रबोधिनी इस्लामपूर, संपा.पाटील शामराव. |
| ७ | दै.नवशक्ति, मुंबई | - | कै.राजारामबापू पाटील, १७ जाने., १९८६, पृ. |
| ८ | पारेकर दशरथ | - | दिलखुलास व्यक्तिमत्व, राजारामबापू पाटील ज्ञान प्रबोधिनी, इस्लामपूर, संपा.पाटील शामराव, १९८६, पृ.६ |
| ९ | दै.प्रभात, पुणे | - | एक कृतिशील व्यक्तिमत्व, दि.१७-१-८६, पृ.३. |
| १० | दै.सकाळ, कोल्हापूर | - | उमदा नेता हरपला, १७ जाने., १९८६, पृ.२. |
| ११ | प्रा.पाटील एल.के. | - | मुलाखत, ३०-१०-९३, उरूण इस्लामपूर, वय ५०. |
| १२ | श्री चौधरी पंढरीनाथ | - | गुणग्राहकता, १९८६, पृ.२५, राजारामबापू पाटील ज्ञानप्रबोधिनी, इस्लामपूर, संपा.पाटील शामराव |

१३ महाराष्ट्र विधान परिषद कार्यवाही - शुक्र.१० ऑग.,७९,मुंबई.

१४ उपनिर्दिष्ट - गुरु.,दि.९ ऑग.,१९७९,मुंबई.

१५ उपनिर्दिष्ट - गुरु.,दि.९ ऑग.,१९७९,मुंबई.

१६ उपनिर्दिष्ट - गुरु.२ ऑग.,१९७९,मुंबई.

१७ उपनिर्दिष्ट - गुरु.१० ऑग.,१९७२,मुंबई.

१८ उपनिर्दिष्ट - शुक्र.,२० जुलै,१९७९,मुंबई.

१९ उपनिर्दिष्ट - सोम.,१ ऑग.,१९७७,मुंबई.

२० उपनिर्दिष्ट - बुध.,१५ डिसें.,१९७६,मुंबई.

२१ उपनिर्दिष्ट - १७ ऑग.,१९७३,मुंबई.

२२ उपनिर्दिष्ट - ९ एप्रिल १९७४,मुंबई.

२३ उपनिर्दिष्ट - १२ जुलै,१९७९,मुंबई.

२४ उपनिर्दिष्ट - १९ जुलै,१९७९,मुंबई.

२५ उपनिर्दिष्ट - बुध.,३ ऑग.,१९७७,मुंबई.

२६ उपनिर्दीष्ट - सोम.,१५ मार्च,१९७६,मुंबई.

२७ उपनिर्दिष्ट - शुक्र.,२३ नोव्हें.,१९७३,मुंबई.

२७ उपनिर्दिष्ट - शुक्र.२३ ऑग.,१९७३,मुंबई.

२९ उपनिर्दिष्ट - मंगळ ४ डिसें.,१९७३,मुंबई.

३० उपनिर्दिष्ट - गुरु.,२८ मार्च १९७४,मुंबई.

३१ लोकराज्य - - १६ जून,१९७९,पृ.४,
संपादक ईश्वरराज माथूर.

३२ उपनिर्दिष्ट - महाराष्ट्र विशेषांक १९७९,पृ.५,
संपा.ईश्वरराज माथूर.

३३ उपनिर्दिष्ट - स्वातंत्र्यदिन विशेषांक,
१६ ऑगष्ट,१९७९,पृ.१६,

३४ लोकराज्य - १६ ऑग.,१९७९,पृ.२२.
संपा.ईश्वरराज माथूर.

३५ लोकराज्य - १६ जून १९७९,पृ.२.
संपा.ईश्वरराज माथूर.

३६ लोकराज्य - १६ सप्टेंबर, १९७९, पृ.२४, संपा. ईश्वरलाल माथूर.

३७ लोकराज्य - १ डिसें., १९७९, पृ.१३, संपा. ईश्वरलाल माथूर.

३८ लोकराज्य - १६ डिसें., १९७९, पृ.२१, --,,---

३९ लोकराज्य - १ सप्टें., १९७९, पृ.२७ --,,--

४० लोकराज्य - १६ फेब्रु., १९७९, पृ.३४ --,,--

४१ लोकराज्य - १६ फेब्रु., १९७९, पृ.३५ -,,---

४२ लोकराज्य - १ जून १९७९, पृ.२३, --,,--

४३ लोकराज्य - १ ऑक्टोबर, १९७९, पृ.७९ --,,--

४४ लोकराज्य - १६ ऑगस्ट., १९८०, पृ.४३ --,,--

४५ दै. नवशक्ति - मुंबई, दि.१७-१-१९८६.